जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०५.०९.२०२५**

'' वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक दलाल महिला आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ''

दिनांक ०४/०९/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गोरडे यांना माहिती मिळाली की, पुजा व्हेज ॲन्ड नॉनव्हेज हॉटेल, गाळा नं. ५, जय माता दी कंपाउंड जवळ, काल्हेर, भिवंडी या ठिकाणी एक दलाल महिला काही असहाय्य मुलींना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे. सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सापळा लावून एक दलाल महिलेस ताब्यात घेवुन तिच्या रखवालीत असलेल्या ०१ पिडीत मुलींची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत दलाल महिला आरोपीविरुध्द नारपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर ।१०६०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १४३ (१) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदर कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.रविंद्र दौंडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी/वैशाली गोरडे, मपोउपनि/स्नेहल शिंदे, पोहवा/सुवारे, पो.हवा./पाटील, मपोहवा/भगत, मपोअंम/खरात, चापोअंम/निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

प्रस्तुत गुन्हयातील महिला दलाल आरोपी हिचे विरुध्द यापुर्वी देखील अशाच गुन्हा प्रकारचा मिरारोड पोलीस ठाणे येथे दाखल आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर